# २९वी राज्यस्तरीय शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा

*या स्पर्धेतील विजेत्यांना पुढीलप्रमाणे पारितोषिके दिली जातील :*

**प्रथम पारितोषिक : रु. १०,०००** (हे पारितोषिक शैलजा तळेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मिलिंद तळेकर यांनी पुरस्कृत केले आहे.)
**द्वितीय पारितोषिक : रु. ७,०००** (हे पारितोषिक पं. वामनराव भावे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ शंतनू रास्ते यांनी पुरस्कृत केले आहे.)
**तृतीय पारितोषिक : रु. ५,०००** (हे पारितोषिक प्रभाकर आघारकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संध्या घाडगे यांनी पुरस्कृत केले आहे.)
**विशेष गुणवत्ता पारितोषिक :** रु. ४,००० (हे पारितोषिक विश्वास भिडे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ अनिरुद्ध भिडे यांनी पुरस्कृत केले आहे.)
गुणवत्ता प्रमाणपत्र : अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या सर्व स्पर्धकांना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येईल.
अंतिम फेरी स्पर्धेनंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभ होईल.
**(या स्पर्धेचा खर्च डॉ. यशवंतराव पर्वते व मंगला पर्वते, भामिनी गणपुले, दामोदर विठ्ठल प्रधान, गोपाळकृष्ण राव, आशा गद्रे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबियांनी तसेच सरस्वती बाळकृष्णा यांनी या स्पर्धेसाठी दिलेल्या देणगीच्या व्याजातून देण्यात येत आहे.)**
*प्रवेश-अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०२४ आहे. प्रवेश अर्ज गूगल फॉर्मच्या माध्यमातूनच पाठवावा.*

**मधुरा सोहनी**
*संगीत स्पर्धा समिती प्रमुख*
**पनवेल कल्चरल असोसिएशन**

***अधिक माहिती आणि संपर्कासाठी पत्ता :***

**पनवेल कल्चरल असोसिएशन :** आशीर्वाद बिल्डिंग, को. ए. सो. शैक्षणिक संकुलाजवळ, पनवेल – ४१० २०६.
**E-mail :** panvelculturalcentre@gmail.com / jayant.tilak@gmail.com
**स्पर्धा समिती प्रमुख : मधुरा सोहनी :** कॉल आणि व्हॉटस् ॲप : ९९२०७ १८७४५
**विद्यालय प्राचार्य : नंदकुमार कर्वे :** कॉल आणि व्हॉटस् ॲप : ९८६९४ ३०२६९
**संस्था अध्यक्ष : मिलिंद गोखले –** कॉल आणि व्हॉटस् ॲप : ८८७९९ ८७३७१



# पनवेल कल्चरल असोसिएशन

स्थापना - १९९०

संस्था नोंदणी क्र. ३७/९७ ■ सार्व. विश्वस्त नोंदणी क्र. एफ् २३५७

**कार्यालय व संगीत विद्यालय :** आशीर्वाद बिल्डिंग, को.ए.सो. शैक्षणिक संकुलाजवळ, व्ही. के. हायस्कूल रोड, पनवेल - ४१० २०६. **मोबाइल :** 81699 33784

**इमेल :** panvelculturalcentre@gmail.com **वेबसाईट :** www.panvelcultural.org.in

HEADING TOWARDS.. 35th ANNIVERSARY

दि. १ नोव्हेंबर २०२४

# २९वी राज्यस्तरीय शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा

युवा पिढीमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण व्हावी, हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचा समृद्ध वारसा त्यांनी जतन व संवर्धन करावा, तसेच उभरत्या व गुणी कलाकारांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने गेली २८ वर्षे या संस्थेतर्फे हिंदुस्तानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा आयोजित केली जात आहे. यात सहभागी स्पर्धकांनी २० मिनिटांच्या कालावधीत ख्याल आणि द्रुत लयीतील बंदिश गावी अशी संस्थेची अपेक्षा आहे.

ही स्पर्धा दोन फेऱ्यात होईल. पहिल्या फेरीसाठी स्पर्धकांनी स्वत: हजर रहावयाचे नसून आपल्या गायनाचा व्हिडीओ इ-मेल किंवा टेलिग्रामच्या माध्यमातून संस्थेकडे पाठवायचा आहे. **स्पर्धेत भाग घेण्यासाठी अंतिम तारीख १५ डिसेंबर २०२४ आहे. प्राप्त झालेल्या प्रवेशिकांमधून १० स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात येईल. अंतिम फेरी रविवार, दि. १२ जानेवारी २०२५ रोजी** पनवेल कल्चरल सेंटरचे सभागृह आशीर्वाद बिल्डिंग, व्ही. के. हायस्कूलजवळ, पनवेल येथे घेण्यात येईल.

***स्पर्धेचे प्रमुख नियम व अन्य माहिती पुढीलप्रमाणे :***

**सा.** ही स्पर्धा वय १६ ते ४५ दरम्यानच्या फक्त हौशी कलाकारांसाठी खुली आहे. व्यावसायिक गायक-गायिकांना या स्पर्धेत भाग घेता येणार नाही. (व्यावसायिक कलावंत : जे कलावंत शास्त्रीय संगीतात आकाशवाणी किंवा दूरदर्शनचे मान्यताप्राप्त कलावंत आहेत, किंवा जे शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम मानधन घेऊन सादर करतात.) प्रथम प्रवेश-अर्ज पाठविणाऱ्या केवळ ३० स्पर्धकांनाच या स्पर्धेत भाग घेता येईल.

**रे.** सहभागी स्पर्धकांनी हार्मोनियम साथ न घेता केवळ तानपुरा व तबला यांची साथ घेऊन (तानपुरा मशिन आणि तालमालाही वापरता येईल) घरच्या घरी आपल्या गायनाचा व्हिडीओ तयार करावयाचा आहे. यात **कोणत्याही एका रागातील अथवा तालातील एक ख्याल १५ मिनिटे आणि त्याच रागातील मध्यलयीतील बंदिश (५ मिनिटे) असे एकूण २० मिनिटांचे सादरीकरण** व्हिडीओ क्लिपच्या रुपात दि. **१५ डिसेंबर २०२४ पूर्वी** संस्थेकडे पाठवायचे आहे. स्टुडिओत केलेले ध्वनिमुद्रण ग्राह्य धरले जाणार नाही.

**ग.** १५ डिसेंबर २०२४ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रवेशिकांमधून १० स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात येईल. **२७ डिसेंबर २०२४** नंतर सर्व स्पर्धकांना स्पर्धेच्या पहिल्या फेरीचा निकाल कळविण्यात येईल. **दि. १२ जानेवारी २०२५ रोजी** पनवेल कल्चरल सेंटरचे सभागृह, पनवेल येथे सकाळी १० ते १ आणि दुपारी २ ते ६ दरम्यान अंतिम फेरी घेण्यात येईल.

**म.** अंतिम फेरीमध्ये तुम्ही फॉर्म भरताना निवडलेल्या चार रागांपैकी परीक्षक (स्पर्धेच्या दिवशी) सांगतील त्या रागातील ख्याल (१५ मिनिटे) आणि मध्यलयीतील बंदिश (५ मिनिटे) असे एकूण २० मिनिटांचे सादरीकरण स्पर्धकाने प्रत्यक्ष हजर राहून करावयाचे आहे. या अंतिम फेरीसाठी साथसंगतीसाठी आवश्यक असलेली हार्मोनियम, तानपुरा व तबला ही वाद्ये, तसेच उत्तम वादक यांचे आयोजन संस्था करील. तुमच्या सादरीकरणापूर्वी तुम्हाला सभागृहातच पण स्वतंत्र कक्षामध्ये साथीदारांसह तालीमही करता येईल. **साथसंगतकार संस्थेचेच घ्यावे लागतील.**

**प.** स्पर्धेची प्रवेश फी रु. २००/- असून ती पुढील बँकेत ट्रान्सफर करता येईल. फी जमा केल्याचा स्क्रीनशॉट पाठविणे आवश्यक.

**Bank Details :** Janakalyan Sahakari Bank Ltd. M. P. Marg, Panvel Branch

**Title of the account :** Panvel Cultural Association

**SB A/c No.** 023010100008773 **IFSC code :** JSBL0000023

**ध.** अंतिम फेरीतील सर्व स्पर्धकांना (संस्थेने निर्धारित केल्यानुसार) योग्य तो प्रवासखर्च देण्यात येईल, तसेच सर्व स्पर्धकांची भोजनाची व्यवस्था संस्थेतर्फे करण्यात येईल.

**नी.** या स्पर्धेसाठी तज्ज्ञ परीक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परीक्षकांचे निर्णय अंतिम राहतील व ते सर्व संबंधितांवर बंधनकारक असतील.

**कृपया पुढील पानावर पहा..** ▶